# कुटुंबातील प्रत्येकाचा विचार करणं महत्त्वाचं!

**माझ्या कुटुंबामध्ये कोण-कोण आहे, यावर मी उत्तर देईन, की मी, माझी पत्नी, माझा मुलगा व आमची कंपनी 'प्राज इंडस्ट्रीज'चे सर्व कर्मचारी! 'प्राज'ची धुरा सांभाळताना कुटुंबप्रमुख म्हणून या प्रत्येकाचा विचार मी करतो... सांगताहेत प्राज इंडस्ट्रीजचे अध्यक्ष प्रमोद चौधरी...**

**अदिती पटवर्धन**

कौटुंबिक मूल्यं ही प्रत्येक कुटुंबात जपली जात असतात. एकमेकांची काळजी घेणं आणि परस्परांचा आदर करणं ही माझ्यासाठी सर्वांत महत्त्वाची मूल्यं आहेत. 'प्राज'मध्ये विविध पद्धतीने ही मूल्यं जपण्याचा मी प्रयत्न करतो. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, कोणताही कर्मचारी जेव्हा आमच्या कंपनीशी जोडला जातो, तेव्हा तो एकटा जोडला जात नाही, तर त्याचं संपूर्ण कुटुंब 'प्राज'शी जोडलं जातं. आम्ही वेगवेगळ्या उपक्रमांच्या माध्यमातून कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांना आमच्याशी आणि एकमेकांशी जोडण्याचा प्रयत्न करतो. कर्मचाऱ्यांच्या लहान मुलांची कंपनीतर्फे सहल नेली जाते. या वर्षी मुलं अॅडलॅब्स इमॅजिकाला जाऊन धमाल करून आली! शिवाय त्यांच्यासाठी वेगवेगळ्या सांस्कृतिक स्पर्धा घेतल्या जातात. केवळ मजा-मस्तीच नाही, तर पौगंडावस्थेसारख्या नाजूक अवस्थेतून जाणाऱ्या मुलांसाठी आम्ही 'टीन्स' हा समुपदेशनाचा उपक्रम सुरू केलाय. या सर्वांतून प्रत्येक जण जोडला जातो.

ज्याप्रमाणे आपल्याला आपल्या कुटुंबाचा अडीअडचणीच्या काळात आधार वाटतो, त्याचप्रमाणे कर्मचाऱ्यांना 'प्राज'चा आधार वाटावा, असा आमचा प्रयत्न असतो. आजारपणात त्वरित उपचार मिळावेत, नियमित तपासण्या व्हाव्यात यासाठी आम्ही दीनानाथ मंगेशकर रुग्णालयासारख्या काही रुग्णालयांच्या



प्रमोद चौधरी

मदतीने प्रयत्न करतो. याशिवाय 'प्राज'च्या कुटुंबाकडून सामाजिक बांधिलकी जपली जावी, असाही आमचा आग्रह असतो. रक्तदान शिबिरं आयोजित करणं किंवा कर्मचाऱ्यांसाठी 'ग्रीन फॅमिली स्पर्धा' आयोजित करून त्यांना पर्यावरणपूरक दिनक्रम अंगीकारण्यास प्रोत्साहन देणं यातून आम्ही सामाजिक बांधिलकी जपतो.

एक कुटुंबप्रमुख म्हणून मी नेहमीच सर्वांना वेळ देण्याचा, नियमितपणे संवाद साधण्याचा प्रयत्न करतो. मी व माझी पत्नी परिमल चौधरी, आम्ही वेळोवेळी कर्मचाऱ्यांशी संवाद साधतो, त्यांच्या घरीही भेट देतो, ज्यामुळे आमच्यातला संवाद टिकून राहतो, नातं अधिक घट्ट होतं. माझी पत्नी आणि माझा मुलगा यांचाही या सर्वांत मोलाचा वाटा आहे. कर्मचाऱ्यांच्या पत्नींना कंपनीमध्ये अधिक सहभागी करून घेण्यासाठी परिमल यांनी 'स्पाउजेस ऑफ प्राजाइट्स' हा उपक्रम सुरू केला. त्याअंतर्गत शिवणकाम, भरतकाम किंवा पाककला असे विविध उपक्रम राबवले. आमचे अनेक कर्मचारी पुण्याबाहेरचे, महाराष्ट्रातील खेड्यांमधून आलेले आहेत. अशा व्यक्तींना आम्ही पुण्यात स्थायिक होण्यासाठी लागेल ती मदत करतो, शहरातील वातावरणाशी जुळवून घेणंही त्यांना त्यामुळे सोपं जातं.

थोडक्यात 'कुटुंब' या शब्दाला स्वतःच्या घरापुरतं मर्यादित न ठेवता त्याची व्याप्ती आम्ही वाढवलीय. अर्थातच, कुटुंबप्रमुख या नात्याने जशा माझ्या काही जबाबदाऱ्या आहेत, तशा अपेक्षादेखील आहेत. कल्पकता हे आमचे प्रमुख ध्येय आहे, त्यामुळे मला 'कुटुंबा'तील प्रत्येकाकडून कल्पकतेची अपेक्षा आहे. त्याबरोबरच सच्चेपणा आणि प्रतिसादाची मी त्यांच्याकडून अपेक्षा करतो. १९९९ मध्ये आमच्या कंपनीला मंदीचा फटका बसला होता, तेव्हा आमच्या जुन्या कार्यालयामध्ये पुराचं पाणी शिरलं होतं. या संकटकाळात आमचे कर्मचारीच कंपनीच्या पाठीशी उभे राहिले. प्रसंगी त्याग करून त्यांनी कंपनीला साथ दिली. आपले बंध किती घट्ट आणि सच्चे आहेत, हे नेहमीच अशा संकटकाळामध्ये सिद्ध होत असतं, नाही का?